# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सांगली (आपत्ती व्यवस्थापन)

पत्ता -विजयनगर सांगली-मिरज रोड फोन -0233-2600185 E-mail- sanglirdc@gmail.com

क्र.गृह 1/कार्या-6/आ.नि.क./आरआर13/२० दिनांक:22/06/2020

## ई - निवीदा सूचना क्र, 1. सन २०२०

### जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील आपत्ती कक्षासाठी लाईफ जॅकेट खरेदी करणेबाबत

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत लाईफ जॅकेट खरेदी करण्यात येणार आहेत यासाठी अनुभवी व सुयोग्य इच्छूक पुरवठादाराकडून दोन लिफाफा पध्दतीनी ई निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे. |
| २ | |

| Specification | Conformity to technical requirement | Synthetic life jacket as per NDRF approved specification |
|---|---|---|
| SIZE | Overall size (length x Width x thickness ) | 68 cm x 37 cmx10 cm |
| MATERIAL | Outer fabric for synthetic life jacket | Any other material as per buyers requirements |
| | Mass of outer fabric (g/square mtr) | 140 |
| | Inner foam | Polythene |
| | Inner foam is non water absorb type | yes |
| | Density of polyethylene foam(kg per cubic meter) | 24 |
| | Thickness and number of layers of polyethylene foam at different portions of jacket | No.of layers 10mm kay 10 thickness 100 mm |
| | Composition of webbing tightening life jacket to waist | Nylon |
| | Width of Webbing for tightening life jacket to waist | 38 |
| | Composition of webbing at chest portion | Nylon |
| | Width of webbing at chest portion | 25 |
| | Composition of webbing formed loop around Waist Web (lifting Web) | Nylon |
| | Width of webbing forming lop around waist web (lifting Web) | 25 |
| | Retro reflective | Yes |
| | Buckets | Nylon |
| | Sewing thread | Nylon |
| | Breaking load of sewing thred(min)(20 cm between grips) | 25 |
| Colour | Colour (outer Fabric) | Orange |
| | Colour of Waist and Chest Webbing | Black |
| | Colour of Lifting Web | Blue |
| Buoyancy/Floatability | Buoyancy/Floatability | 16.5 |

| | | |
|---|---|---|
| USER WEIGHT | Maximum Weight of User for which suitable | 100KG |
| CERTIFICATION | Indian Registrar of shipping Approval(certification)conforming to SOLAS standard/requirements | yes |
| | IRS Certificate No and Date | 2014TAC017 AND 23/04/2014 |
| | Validity of Certificate | 24/04/2019 |
| LOGO | Departmental LOGO | As per buyers requirements |
| | Size,design and Location of Logo as per buyer's requirement | As per buyers requirements |
| TEST REPORT | Availability of Test Report from designated AHSP/NABL/ILAC accredited of Central Government Lab to prove conformity of products to the specification | True |
| | Test report No. | 2014TAC017 |
| | Test Report Date | 23/04/2014 |
| | Name of the Lab | IRS |
| | Adress of the Lab | MUMBAI |
| | Test report to be furnished to buyer on demand if claimed to be available | YES |
| ADVANCE SAMPLE | Agree to provide Advances Samples(s) for buyer's approval before commencement of supply | Yes |

**निविदा प्रक्रियेचे स्वरुप**

१. संपुर्ण निविदा प्रक्रिया ही ई निविदेद्वारे होणार असून निविदा सुचना, अटी व शर्ती ई.माहिती https://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. ई-निविदा फॉर्म किंमत रु.३०००/- इतकी राहिल.

३. बयाना रक्कम रु.५०,०००/- इतकी राहिल.

४. ई निविदेसाठी पुरवठाधारकाकडे / निविदा धारकाकडे डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट (DSC) असणेआवश्यक आहे. व त्यांनी निविदा संकेतस्थळावर रजीस्टर होणे आवश्यक आहे. यासाठी निविदाधारकाकडे अधिकृत ईमेल आयडी असावा.

५. ई निविदा फॉर्म सुरु होणेचा कालावधी (Download कालावधी ) दि. २२.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून दि. २६.०६.२०२० सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत असेल.

६. निविदापुर्व बैठक (Pre bid meeting) दि.२३.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालयात आयोजित करणेत आली असून सदर बैठकहीस निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहतील.

७. ऑनलाईन निविदा भरणेचा (Upload) कालावधी दि. २२.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून ते दि. २६.०६.२०२० रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत असेल.

८. अर्जाची शुल्क् व बयाना रक्कम ऑनलाईन स्किारणेत येतील.

९. ई निविदेचा तांत्रीक लिफाफा क्र.१ दि.२९.०६.२०२० या तारखेस सकाळी ११.०० वाजता निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय यांचेपुढे उघडणेत येतील. त्यावेळी सर्व निविदा धारकांनी निविदेसोबत सादर

केलेल्या कागदपत्रांच्या मुळप्रतिसह उपस्थित रहावे. कांही अपरिहार्य कारणामुळे हि तारीख व वेळ बदललेस याबाबतची सुचना ई निविदा प्रणालीवर देणेत येईल.

१०. तांत्रीक लिफाफयाचे मुल्यांकन प्रथम करणेत येईल. आणि ज्या तांत्रीक निविदा स्विकारार्ह आढळून येतील फक्त अशा निविदांचा अर्थिक (व्यापारी) लिफाफा क्र.२ उघडणेत येईल.

११. प्राप्त निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणेचे अधिकार अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेले आहे.

(डॉ. अभिजीत चौधरी)
अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा
जिल्हाधिकारी सांगली

# तांत्रिक लिफाफयामध्ये Upload करावयाची आवश्यक कागदपत्रे

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे.

ए) निविदाधारकाची तपशीलवार माहिती देणारा नमुना भरुन स्वाक्षरीत करून अपलोड करावा. (परिशिष्ठ १)

बी) बयाणा रक्कमभरणेपासून सुट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व शासन निर्णयाची प्रत (पुराव्या दाखल सादर केलेल्या प्रमाणपत्रामध्ये संस्था / संबधीत यंत्रणा यांना निविदेच्या किती रक्कमेच्या मर्यादेपर्यत बयाणा रक्कम भरण्याची सूट देण्यात येत आहे त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.)

सी) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र / संस्था नोंदणी प्रमाणपत्र / बचत गट अथवा इतर प्रकारचे गट असल्यास त्यास सक्षम प्राधिका-याचे नोंदणी प्रमाणपत्र.

संस्था / बचतगट यांचे बाबतीत त्यांच्या उपविधीमध्ये निविदा ज्या बाबीसाठी मागविली आहे त्या बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

व्यापारी घटक असल्यास शॉप अॅक्टचे प्रमाणपत्र अदययावत असणे आवश्यक आहे.

ज्या ठिकाणी शॉप अॅक्ट लागू नाही तेथे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व निविदा ज्या बाबीसाठी मागविली आहे त्या बाबीचा उल्लेख त्यात असावा.

डी) मागील ३ वर्षाचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणीत केलेले वार्षीक अर्थिक उलाढाल प्रमाणपत्र अर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० चे. तसेच याचे कालावधीचा प्रमाणीत ताळेबंद पत्रक (Balance sheet). तसेच मागील दोन वर्षाची अर्थिक उलाढाल निविदेच्या अंदाजित रकमेएवढी असावी.

इ)पॅनकार्ड व मागील तिनवर्षाचे आयकर भरणाकेलेचे विवरणपत्र अर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०

एफ) G.S.T./ सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र व डिंसेबर २०१९ अखेरचे भरणा केलेले चलनासह किंवा निपटारा प्रमाणपत्र किंवा संबंधित प्राधिका-याकडे मागणी केलेल्या पत्राची प्रत.

जी) सन २०१९-२० अखेर व्यवसायकर भरणा केल्याची पावती/निपटारा प्रमाणपत्र.

एच) ऐपतीचा दाखला (solvency certificate) रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख रुपये मात्र) (राष्ट्रीयीकृत बँकेचे )

आय.) निविदेच्या अटी व शर्ती (प्रपत्र-अ), दराबातचे हमीपत्र (प्रपत्र-ब), शपथपत्र ड व इ परिशिष्ट-2 निविदा धारकाने सही व शिक्कयासह स्वाक्षरी करून त्याची प्रत upload करावी.

जे) अनुभवाचा दाखला - यापुर्वी शासकीय/निमशासकीय संस्थेस लाईफ जॅकेट पुरवठा केलेबाबतचा दाखला

के) निविदाधारक फर्म अथवा कंपनी, सहकारी संस्था ,भागीदारी संस्था, बचत गट इत्यादी स्वरुपात असल्यास निविदा भरण्यासाठी प्राधिकृत केलेल्या संबंधीत व्यक्तीच्या नावाचे मुखत्यार पत्र (Power of Attorney)(परिशिष्ठ ३)

उपरोक्त ए ते के मधील कागदपत्रे अनिवार्य आहेत अन्यथा तांत्रिक लिफाफा नाकारण्यात येईल,याच बरोबर निविदा भरतेवेळी सदर कागद पत्रे ए ते के या क्रमाने भरण्यात यावीत,

**सुचना: उपरोक्त तांत्रीक लिफाफयातील अपलोड करण्यात येणा-या प्रमाणपत्रांच्या प्रतिवर स्वसांक्षांकन करणे बंधनकारक राहील.**

(डॉ. अभिजीत चौधरी)

**अध्यक्ष**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा

जिल्हाधिकारी सांगली

## प्रपत्र- अ

## निविदेच्या अटी व शर्ती

## (निविदाधारकाने या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरीत करुन तांत्रिक लिफाप्यामध्ये अपलोड करावेत)

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे

१. ई- निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक २६.०६.२०२० सायं. १७.००वाजेपर्यंत राहील.

२. ई-निविदा अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. इतर कोणत्याही स्वरुपात ते स्वीकारण्यात येणार नाही. तसेच बयाणा रक्कम भरणेपासून सुट असलेस सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र अपलोड करणेत यावे.

३. ई-निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्र.१ ( तांत्रिक लिफाफा ) उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मधील आवश्यक ती सर्व कागदपत्रे पूर्ण असतील तरच लिफाफा क्रं.२ (व्यापारी दराचा लिफाफा ) उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ अपूर्ण असल्यास लिफाफा क्र.२ उघडण्यात येणार नाही.

४. प्राप्त ई-निविदेतील लिफाफा क्रं.१ तांत्रिक लिफाफा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील खरेदी समिती समोर ई-निविदा धारक/ई - निविदा धारकाचे प्राधिकृत प्रतिनिधी यांच्या समक्ष दिनांक २९.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येईल. यावेळी सर्व निविदाधारकांनी निविदेसोबत जोडलेल्या मूळ कागदपत्रासह उपस्थित रहावे. काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक व वेळेत बदल झाल्यास त्याबाबत या कार्यालयाचे सूचनाफलकावर सूचना लावण्यात येईल तसेच ई-निविदा प्रणालीवर कळविण्यात येतील.

५. निविदापूर्व बैठक (Pre-bid meeting ) दिनांक २३.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचे कार्यालयात घेण्यात येईल.

६. निविदेचा तांत्रिक लिफाफयाबाबत वाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्वाधिकार अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांना राहतील.

७. ई-निविदा मंजूर केल्याचा दिनांकापासून ७ दिवसाच्या आत अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांचे बरोबर करारनामा करण्यात यावा. व ७ दिवसाच्या आत लाईफ जॅकेटचा पुरवठा जिल्हाधिकारी कार्यालयास करावा लागेल.

८. निविदा मंजूर झाल्यास मंजूर निविदाधारकासच लाईफ जॅकेटचा पुरवठा करणे अनिवार्य आहे.त्यांना उपठेकेदार नियुक्त करता येणार नाही.

९. सदर लाईफ जॅकेटचा वॉरंटी कालावधी किमान ३ वर्ष असणे आवश्यक आहे. किमान पुरवठा कालावधीत पुरवठा केलेल्या वस्तुचा दर्जा खराब असलेचे अढळलेस त्याबद्दल संबंधीत पुरवठाधारकास जबाबदार धरण्यात येऊन त्यांचेवर नियमानुसार उचित कार्यवाही केली जाईल.

१०. विहीत मुदतीत प्राप्त न झालेली ई - निविदा किंवा कागदपत्रे अपूर्ण असलेली ई-निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

११. निविदाधारकाचे यापुर्वी सरकारी/निमसरकारी/ संस्थेत अशा प्रकारचा भाडयाने पुरवठा केला असल्याबाबतचा संबधीत संस्था प्रमुखांचा किमान एक अनुभवाचा दाखला सोबत जोडावा.

१२. आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅनकार्ड )व मागील तिनवर्षाचे आयकर भरणाकेलेचे विवरणपत्र अर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०चे निविदेसोबत जोडणे अनिवार्य आहे.

१३. G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र व डिसेबंर २०१९ अखेरचे भरणा केलेले चलनासह किंवा निपटारा प्रमाणपत्र किंवा संबंधित प्राधिका-याकडे मागणी केलेल्या पत्राची प्रत.

१४. निविदेतील नमूद बाबीच्या दिलेल्या दराव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा वेगळा कर दिला जाणार नाही. थोडक्यात निविदेतील बाबीवर सर्व बाब /वस्तुंचे दर हे सर्व प्रकारच्या करासहित नमूद करण्यात यावेत.

१५. निविदा धारकांनी दर पत्रकामध्ये नमूद केलेले दर हे आवश्यक त्या सर्व बाबींचा व करांचा विचार करुन भरलेले असणे आवश्यक आहे.

१६. यशस्वी निविदा धारकाला खरेदी प्राधिका-याकडे सदर लाईफ जॅकेट पुरवठा करणेच्या कामाचे अंदाजित किंमतीच्या ३ % इतकी अनामत (सुरक्षा) रक्कम डिमांड ड्राफटद्वारे किंवा अनुसूचित वाणिज्यिक / राष्ट्रीयकृत बॅकेच्या हमीपत्राद्वारे ठेवावी लागेल. बॅकेचा हमीचा नमुना परिशिष्ट ४ प्रमाणे सादर करावा लागेल.

१८. बयाणा / अनामत व देयकाची रक्कम अदा करणेस विलंब झालेस त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

१९ सदर निविदेसाठी रक्कम रुपये एकलक्षचे राष्ट्रीयकृत बँकेचे सद्यस्थितीचे सॉल्व्हेन्सी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२०. मंजूर केलेले दर हे आदेशाचे दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी अंमलात राहतील.

२१. ठेकेदारास कोणत्याही कारणास्तवमध्येच ठेका बंद करता येणार नाही. एकदा दर मंजूर झाल्यावर कोणत्याही कारणास्तव पुन्हा दर वाढवून मिळणार नाही.

२२. अचानक लाईफ जॅकेटचा पुरवठा न केल्यास पर्यायी व्यवस्थेपोटी होणा-या जादा खर्चास ठेकेदार जबाबदार राहील व जादा खर्च होणारी रक्कम त्याच्या सुरक्षाठेवेच्या रक्कमेतून अथवा देय असणा-या इतर कोणत्याही रक्कमेतून वसूल केली जाईल.

२३. ठेकेदाराच्या बिलातून नियमाप्रमाणे आयकराची रक्कम कपात करण्यात येईल व २ टक्के दराने GST TDS वसुल करणेत येईल.

२४. लाईफ जॅकेट साहित्याचा पुरवठा समाधानकारक नसल्यास ठेका केव्हाही बंद करण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेला आहे.

२५. ई - निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी राखुन ठेवला आहे.

२६. सदर साहित्याचा पुरवठा जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे करण्याचा आहे .

२७. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (ॲडव्हॅन्स) दिला जाणार नाही.

२८. सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३१. ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील किंवादरा बाबत संदिग्धता असेल अशी निविदा नाकारले जाणेस पात्र ठरेल तसेच अक्षरी व अंकी दरामध्ये फरक असल्यास जो दर कमी असेल तोच दर ग्राहय धरणेत येईल.

३२. निविदा धारकाने निविदा मध्ये नमुद केलेले दर सर्व करासहित व वाहतूक खर्चासहित असाव्यात.

३३. ज्या ठेकेदाराला उपरोक्त बाबीकरीता ठेका मंजूर करणेत येईल त्यांना कामाचा आदेश देणेपूर्वी त्यांचेकडून र.रु. १०० च्या बॉडपेपरवर अटी व शर्तीसह सबंधीत बाबीचा पुरवठा करणे साठीचे बंधपत्र लिहून घेणेत येईल.

३४. साहित्याचा पुरवठा योग्य प्रकारे न केल्यास अनामत रक्कम शासन खाती जमा करणेत येईल.

३५. सदर साहित्याचा पुरवठा समाधानकारक झाल्याचे निदर्शनास आल्यावर बिलाची रक्कम अदा केली जाईल

३६. प्रशासकीय व इतर निकडीच्या कारणास्तव या ठेक्यासबंधात अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी घेतलेले निर्णय सर्व निविदा कारांना अथवा नियुक्त अभिकर्तांना बंधनकारक राहील.

३७. निविदा मंजूर करणे अगर नाकारणे आणि आवश्यक वाटल्यास विभागून देणे शर्ती बदलणे हे अधिकार अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेले आहेत.

(टिप : दराच्या लिफाफयामध्ये लाईफ जॅकेटचे दर नमूद करताना स्थानिक बाजारातील वाढणारी महागाई व वाहतूक खर्च या सर्व परिस्थितीचा पूर्व विचार करुनच भरण्यात आलेला असून भरलेल्या दराशिवाय इतर कोणती मागणी ग्राहय धरली जाणार नाही हे निविदाधारकास मान्य आहे.असे निविदाधारकाने हमीपत्र द्यावे)

सदर बाबी मान्य असल्याबाबत निविदाधारकाची संमती आहे.

**निविदाधारक व्यक्ती /संस्था/ फर्म /**

**पूर्ण पत्ता :-**

**दिनांक :-**

**स्थळ :-**

**प्राधिकृत प्रतिनिधी / मालक / पार्टनर यांची स्वाक्षरी :-**

**स्वाक्षरी करणा-याचे संपूर्ण नाव :-**

**महाराष्ट्र शासन**

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे.

**प्रपत्र -ब**

लिफाफा क्र. 2

दराबाबत हमीपत्र

मी / आम्ही असे जाहीर करतो की, मी /आम्ही हे दरपत्रक सादर करण्यापूर्वी दरपत्रकामध्ये भरलेले दर ज्यावर आधारलेले आहेत अशा वस्तूंचेस्वरुप / स्थानिक बाजारभाव / मनुष्यबळ /वाहनावळ इ. बाबींचा/ परिस्थितीचा पूर्ण विचार करुन काळजीपूर्वक अभ्यास करुन, सर्व बाबीसमजून घेऊन दर नमूद केलेले आहेत.

तसेच ई-निविदा फॉर्म मधील अटी व शर्ती मी / आम्ही पूर्णपणे वाचल्या असून त्या मला/ आम्हाला मान्य आहेत, याबाबत आमची कोणतीही तक्रार नसून आम्हाला सर्व बाबी समजलेल्या आहेत, व कोणत्याही नियमांच्या अटी व शर्तींचा भंग आम्ही करणार नाही, अशी आम्ही हमी देत आहोत.

**ठिकाण :**

**दिनांक**

**निविदाधरकाची सही**

**नाव व पत्ता**

**प्रपत्र - क**

**(रक्कम रु १०० चे स्टॅम्प् पेपरवर )**

**शपथपत्र**

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे.

मी -------------------------------------------------------------------------- या वरुन असे प्रतिज्ञापत्र देतो की, या अर्जात नमूद करण्यात आलेल्या ई-निविदा फॉर्म 'अ'' मधील माहिती, अटी, शर्ती वैयक्तिक माहिती मी पूर्णपणे वाचून समजून घतली असून ती बरोबर असून त्या मला मान्य आहेत. तसेच काही अपरिहार्य कारणामूळे देयकांची रक्कम अदा करण्यास उशीर झाल्यास सदर रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही, याची मला / आम्हाला जाणिव आणि पूर्ण कल्पना आहे. त्या मला / आम्हाला मान्य आहेत. तसेच ई - निविदेसोबत दिलेली माहिती चौकशीअंती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्यावर / आमच्यावर शासनाच्या नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची मला / आम्हाला जाणिव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**निविदाधरकाची सही**

**नाव व पत्ता**

**प्रपत्र ड**

**(रक्कम रु १०० चे स्टॅम्प पेपरवर)**

**<u>शपथपत्र</u>**

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे

प्रमाणित करण्यात येते की, मी -------------------------------------------- तालुका -------------------------- जिल्हा --------- जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करणे कामी लाईफ जॅकेट पुरवठा करणेकामी निविदा भरलेली असून निविदेमध्ये दिलेल्या अटी व शर्तीनुसार मागणीप्रमाणे आवश्यक सर्व बाबी/वस्तूंचा पुरवठा विहीत कालावधीत व योग्य दर्जाचा करण्यास बांधील असून, मी/आम्ही त्याकरीता आवश्यक पायाभूत सुविधा माझ्याकडे / आमच्याकडे उपवलब्ध आहेत.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**निविदाधरकाची सही**

**नाव व पत्ता**

## परिशिष्ट - 1

### स्वंय घोषणापत्र

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे

मी ---------------------------------- (निविदा धारकाचे नाव व पत्ता) स्वतः हून घोषित करतो की,

१. निविदा सूचना क्रमांक ----------- दि. ---------------- या निविदेच्या बाबतीत मी निविदा भरलेली आहे.

२. निविदेसोबत जोडलेली (Upload केलेली) सर्व कागदपत्रे ही अधिकृत खरी व वैध आहे.

३. व्यापारी लिफाफा मध्ये (BOQ) नमूद दर हे विना अट / विनाशर्त नमूद केलेले आहे.

४. मी सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास मला निविदेमधून बडतर्फ करणे माझी बयाणा रक्कम जप्त करणे किंवा माझा काळया यादीमध्ये समावेश करणे अशा प्रकारची कारवाई माझयावर होऊ शकते याची मला जाणिव आहे.

५. निविदा कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे प्राधिकार अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांना आहे. आणि माझी या संबधात कोणतीही तक्रार नाही.

६. महाराष्ट्र शासनाच्या / निम शासकीय कार्यालयाच्या कोणत्याही विभागाच्या काळया यादीमध्ये माझा / आमचा समावेश करण्यात आलेला नाही.

७. मी / आम्ही घोषित करतो की, महाराष्ट्र शासनाच्या विरुध्द कोणत्याही न्यायालयामध्ये माझया / आमच्या कोर्ट केस प्रलंबित नाहीत.

८. सक्षम प्राधिकारी अथवा कोर्टाव्दारे या संस्था / कंपनी / बचतगट यांना दिवाळखोर घोषित करण्यात आलेले नाही.

निविदाधरकाची सही

स्थळ -

नाव व पत्ता

ठिकाण -

**परिशिष्ट - 2**

**प्राधिकृत बाबतचे प्रमाणपत्र**

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे

**प्रति,**

अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा

जिल्हाधिकारी सांगली

**मी ------------------------------------ (निविदा धारकाचे नाव) ----------------- या निविदेच्या (निविदेचे नाव व दिनांक) संदर्भात बैठकीत उपस्थित रहाण्यासाठी तसेच निविदेचा तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघडणेच्या वेळी उपस्थित रहाण्यासाठी आणि संस्था / कंपनी / बचत गट यांच्या वतीने पत्र व्यवहार / आवश्यक निर्णय घेण्यासाठी श्री ---------------------------------------------------- यांना प्राधिकृत करीत आहोत. त्यांची नमुना स्वाक्षरी व ओळखपत्राची छायाकिंत प्रत साक्षाकिंत करुन देण्यात येत आहे. धन्यवाद !**

**स्थळ -** **नाव**

**दिनांक -** **सही व शिक्का**

**प्राधिकृत केलेल्या व्यक्तींची नमुना स्वाक्षरी पुढीलप्रमाणे -**

**(सोबत ओळखपत्राची साक्षाकिंत प्रत जोडावी.)**

महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे.

### ई-निविदा सूचना क्र. 1

जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत लाईफ जॅकेट खरेदी करण्यात येणार आहेत यासाठी अनुभवी व सुयोग्य इच्छूक पुरवठादाराकडून दोन लिफाफा पध्दतीनी ई निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | ईनिविदा सुचना क्र. | ई निविदेचा तपशिल | ई निविदेची अंदाजित किंमत | निविदा शुल्क | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | 2020_SNGLI_1 | जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथील नैसर्गिक आपत्ती कक्षाचे बळकटीकरण करण्यातंर्गत ७५० लाईफ जॅकेट खरेदी करणे. | रु.११,७२,०००/- | रु.३०००/- | रु.५००००/- |

सदर कामाची ई-निविदा **https//mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक २२.०६.२०२० सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक २६.०६.२०२० रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत ऑनलाईन उपलब्ध आहे. ई - निविदा दिनांक २६.०६.२०२० रोजी सायं. १७.०० वाजेपर्यंत ऑनलाईन जमा करावयाच्या आहेत. सदर कामाच्या निविदेबाबतची निविदा पुर्व बैठक दि. २३.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता राहील. सदरची ई-निविदा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली फोन नंबर. 0233 - 2600059 येथे दिनांक २९.०६.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ई-निविदेवर फॉर्म फी व बयाणा रक्कम ही **https//mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ई - निविदा भरत असताना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी. सदर ई - निविदाबाबत अटी, शर्ती व इतर माहिती https//mahatenders.gov.inया वेबसाईटवर उपलब्ध् आहे. ई निविदा भरत असतांना काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास NIC मदत केंद्राचा क्रमांक ०२३३- २६००६०० या क्रमांकावर संपर्क साधावा. प्राप्त निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचे अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेले आहे.

ई -निविदा मागणी संदर्भात कोणतेही शुध्दीपत्रक / दुरुस्ती असल्यास ती संकेतस्थ्ळावर प्रसिध्द केली जाईल.

ठिकाण- सांगली

**दिनांक :२१.०६.२०२०**

(डॉ.अभिजीत चौधरी)
अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा
जिल्हाधिकारी सांगली

Signature Not Verified
Digitally signed by NANDKUMAR NAMDEO PAWAR
Date: 2020.06.22 19:50:42 IST
Location: Maharashtra-MH